**ठळक बातम्या**

- राज्यात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला
- मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी महायुतीचा वचननामा प्रसिद्ध
- सोमनाथ स्वाभिमान पर्वात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा सहभाग
- चालू आर्थिक वर्षात देशाची वित्तीय तूट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्केपर्यंत रोखणं शक्य असल्याचा पीडब्ल्यूसी चा अहवाल

**आणि**

- न्यूझीलंड विरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात नाणेफेक जिंकून भारताचा प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय

**<><><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. प्रचार संपण्यासाठी केवळ तीनच दिवस राहिले असून विविध पक्षांनी प्रचारात जोर लावला आहे. जाहीर  सभा, रोड शो, तसंच समाज माध्यमांवरदेखील प्रचाराला रंग चढला आहे. मतदानाच्या आधीचा रविवार असल्यानं आज अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न उमेदवार करत आहेत.

मुंबई महापालिका निवडणूकीचा महायुतीचा वचननामा आज मुंबईत थोड्यावेळेपूर्वी प्रकाशित करण्यात आला. यानिमित्त आयोजित वार्ताहर परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री रामदास आठवले प्रमुख उपस्थित होते. कचरामुक्त मुंबईसह मुंबईचा पाणी प्रश्न मिटवण्यासह मिठी नदी स्वच्छ करण्याचं काम केलं जाईल असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी बोलतांना नमूद केलं....

**होल्ड- बाईट- मुख्यमंत्री (२४ सेकंद)**

बेस्ट बस आणि मेट्रोचं जाळं वाढवण्यासह आरोग्य क्षेत्रात भरीव काम करणार असल्याचं सांगून मुंबईत राहणारा मराठी माणूस बाहेर जणार नाही याची खबरदारी घेणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी बोलतांना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी, बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी निमित्त वैद्यकीय विद्यापीठ तयार करणार असल्याचं सांगून लघु उद्योजकांना पाच लाख रुपये बिनव्याजी कर्ज देणार असल्याचं ते म्हणाले….

**होल्ड- बाईट - उपमुख्यमंत्री शिंदे**

**धारावीचा** पुनर्विकास खासगी विकसकामार्फत नव्हे तर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत होत आहे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या पुनर्विकास प्रकल्पाचं भूमीपूजन होईल असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल प्रचारसभेत दिलं.

माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी काल छत्रपतीसंभाजीनगर इथं सभा घेतली , तर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या बंधूंची एकत्र सभा नाशिकमधे झाली. स्थानिक पाणीपुरवठा, शेतकऱ्यांचे प्रश्न, शाळा, रस्ते इत्यादी समस्यांवरुन त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली.

**ठाणे** शहरात पाणी, कचरा व्यवस्थापन आणि इतर नागरी सुविधा पुरवण्यात महायुतील अपयश आल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला.१५ जानेवारीला मतदान होणार असून लगेचच दुसऱ्या दिवशी म्हणजे १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल कोल्हापूर आणि नाशिक इथं प्रचारसभा घेतल्या. लाडकी बहीण योजना बंद होणार नाही अशी ग्वाही त्यांनी या सभांमधून दिली.

**<><><><><><>**

सोमनाथचा इतिहास हा विजय आणि पुनर्निर्माणाचा तसंच आपल्या पूर्वजांच्या पराक्रम, त्याग आणि बलिदानाचा इतिहास आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज गुजरातमधल्या सोमनाथ इथं सोमनाथ स्वाभिमान पर्वानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. विदेशी आक्रमकांनी सोमनाथ आणि भारताला नष्ट करायचा अनेकदा प्रयत्न करूनही सोमनाथ आणि भारत नष्ट झाले नाहीत, आपल्या पूर्वजांनी प्राणाचं बलिदान देऊन त्यांचं रक्षण केलं, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट मोदी**

**त्याआधी** सोमनाथ स्वाभिमान पर्वाचा भाग म्हणून भव्य शौर्ययात्रा निघाली. गुजरातच्या विविध भागातून आलेले १०८ अश्व आणि डमरू वादक पथक या यात्रेत सहभागी झाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फुलांनी सजवलेल्या वाहनावर आरूढ होत यात्रेचं नेतृत्व केलं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी काही वेळ ढोल वादनही केलं. रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या भक्तगणांनी यात्रेवर पुष्पवर्षाव केला आणि हर हर महादेवचा जयघोष केला. यात्रेच्या मार्गावर विविध ठिकाणी उभारलेल्या व्यासपीठांवर देशभरातून आलेल्या कलाकारांनी नृत्याचं सादरीकरण केलं.

**यानंतर** प्रधानमंत्री राजकोटला जाणार आहेत. राजकोटमधे ते मारवाडी विद्यापीठात आयोजित सौराष्ट्र -कच्छ व्हायब्रंट समिटचं उद्घाटन करतील. त्यानंतर संध्याकाळी गांधीनगर इथं महात्मा गांधी मेट्रो स्थानकाचं उद्घाटन करणार आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि जर्मनीचे चॅन्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्यात उद्या अहमदाबाद इथं द्विपक्षीय चर्चा होणार आहे. व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, आणि संरक्षण क्षेत्राविषयी यावेळी चर्चा होण्याची शक्यता आहे.

**<><><><><><>**

चालू आर्थिक वर्षात देशाची वित्तीय तूट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्केपर्यंत रोखण्याचं उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता असल्याचं पीडब्ल्यूसी या पतमानांकन संस्थेच्या अहवालात म्हटलं आहे. ही तूट यापेक्षाही कमी राहील, आणि यामुळे आर्थिक व्यवस्थापनातली भारताची मजबूत स्थिती जागतिक पातळीवर अधोरेखित होत असल्याचं या संस्थेचे प्रतिनिधी राणेन बॅनर्जी यांनी म्हटलं आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयानं नुकतंच जीडीपी दरवाढीचं उद्दिष्ट १० पूर्णांक १ दशांश टक्क्यावरून ८ टक्क्यावर आणल्यानं वित्तीय तूट कमी ठेवण्याचं उद्दिष्ट सरकार पूर्ण करू शकेल का, याबद्दल साशंकता निर्माण झाली होती. मात्र, एकंदर आकडेवारी अर्थसंकल्पातल्या अंदाजाइतकीच आहे, त्यामुळे वित्तीय तूट रोखण्याचं लक्ष्य सहज पूर्ण होईल, असा विश्वासही बॅनर्जी यांनी व्यक्त केला.

**<><><><><><>**

येत्या १४ जानेवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या ट्राय सर्व्हिस व्हेटरन्स डे निमित्त तिन्ही सैन्यदलांच्या निवृत्त अधिकाऱ्यांच्या विशेष संचलनाचं आयोजन आज मुंबईत मरीन ड्राईव्ह इथे करण्यात आलं होतं. या संचलनात तिन्ही सैन्य दलांचे निवृत्त अधिकारी, नौदलाचे कॅडेट्स, एनसीसी कॅडेट्स यांनीही सहभाग घेतला होता. भारतीय सैन्य दलाचे पहिले फील्ड मार्शल के. एम. करिअप्पा यांच्या निवृत्तीच्या स्मरणार्थ दरवर्षी १४ जानेवारी रोजी ट्राय सर्व्हिस व्हेटरन्स डे साजरा करण्यात येतो.

**<><><><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत लाल बहादूर शास्त्री यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त आज उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी उपराष्ट्रपतीभवनात त्यांना पुष्पांजली अर्पण केली. लाल बहादूर शास्त्री यांचं जीवन साधेपणा, सचोटी

आणि देशाप्रती असलेल्या अढळ निष्ठेचं प्रतीक आहे, असं त्यांनी समाजमाध्यमावर दिलेल्या आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

भारतीय क्रिकेट संघाच्या यंदाच्या हंगामाचा प्रारंभ आज वडोदरा इथं भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या एकदिवसीय सामन्याने झाला. मालिकेतला दुसरा सामना येत्या बुधवारी १४ जानेवारी रोजी राजकोट इथं तर तिसरा आणि अंतिम सामना १८ जानेवारी रोजी इंदूर इथं होणार आहे. आजच्या सामन्यात नाणेफेक जिंकून भारताच्या संघानं प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या 18 षटकात बिन बाद 87धावा झाल्या होत्या.

**<><><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये, दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायंट्स यांच्यातला सामना आज नवी मुंबईच्या डी.वाय. पाटील मैदानावर रंगणार आहे. संध्याकाळी साडेसात वाजता खेळ सुरु होईल

कालच्या सामन्यात मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सचा ५० धावांनी पराभव केला. १९६ धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सला १४५ धावा करता आल्या. हरमनप्रीत कौरला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.

**<><><><><><>**

जनता दलाचे माजी आमदार गंगाधर पटणे यांचं नांदेड इथं निधन झालं. त्यांच्या निधनाबद्दल पक्षानं दुःख व्यक्त केलं आहे. पटणे विधानपरिषदेचे माजी सदस्य होते. साने गुरुजी आणि महात्मा बसवेश्वर यांच्यावर निष्ठा असलेले, ग्रंथालय चळवळीचा आधारस्तंभ,शिक्षणप्रेमी नेते अशी त्यांची ओळख होती.

**//<><><><><><>//**